॥ शतक महोत्सवी संस्था ॥

रजि.नं. ११९२८ स्थापना दि. ०४/१०/१९१२

कार्यक्षेत्र – सांगली, कोल्हापूर, सातारा

# दि सांगली सॅलरी अर्नर्स को-ऑप. सोसायटी लि., सांगली

पत्ता : ११०४-ब, हरभट रोड, सांगली – ४१६ ४१६ फोन नं. हेड ऑफिस : २३३१४४२ / २३३२००८

शाखा : मिरज-(०२३३)२२२७४७९, इस्लामपूर-(०२३४२)२९५४८०, तासगांव-(०२३४६)२४२४४५, विटा-(०२३४७)२७२१२२, जत-(०२३४४)२४८९३०, शिराळा-(०२३४५)२९५४९२, विजयनगर-(०२३३)२६०२४४२, कोल्हापूर-(०२३१)२६६१४४२, कराड-(०२१६४)२२१४४१

**E-mail :** sanglisalary@gmail.com | **Website :** www.sanglisalary.com


जा.क्र.: /२०२५/२६ **(फक्त सभासदांकरीता)** दिनांक : २५/०८/२०२५

## विद्यार्थी बक्षीस योजना परिपत्रक

**प्रति,** ______________________________

**स.न.वि.वि.**

**संस्थेच्या सभासदांच्या ज्या मुला-मुलींनी सन २०२४-२०२५ सालात खालीलप्रमाणे यश मिळवलेले आहे. अशा मुलांचा संस्थेमार्फत सत्कार करून त्यांना उत्तेजनार्थ बक्षीस देण्याचा निर्णय संस्थेच्या संचालक मंडळाने घेतला आहे.**

१) इ. १ ली ते इ. ९ वी वर्गाच्या परीक्षेत शहरी भागात सर्व विषयात अ-१ ग्रामीण भागात अ-२ श्रेणी घेवून उल्लेखनीय यश मिळविलेस बक्षीस दिले जाईल.

२) एस.एस.सी. व एच.एस.सी., आय.टी.आय परिक्षेत ७०% गुण मिळवून उल्लेखनीय यश मिळवलेले.

३) कोणत्याही पदवी/पदविका परीक्षेत ५०% पेक्षा जास्त गुण मिळवून उल्लेखनीय यश मिळवलेस.

४) अभियांत्रिकी व वैद्यकीय शाखेतील पदव्युत्तर परिक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यास.

५) जिल्हा व राज्य स्तरावर शासनाने / फेडरेशन मान्यतेने आयोजित केलेल्या खेळांमध्ये विशेष प्राविण्य मिळविल्यास.

### संस्थेच्या सभासद व हितचिंतक यांनी सभासदांच्या पाल्यांना वैयक्तिकरित्या प्रोत्साहनपर खालीलप्रमाणे बक्षीसे ठेवलेली आहेत.

१) संस्थेचे विद्यमान चेअरमन **श्री. राजेंद्र सखाराम कांबळे** संस्थापक, चेअरमन, सांगली जिल्हा ग्रामीण रूग्णालये सेवकांची सह. सो.मर्या.सांगली यांचेकडून एस.एस.सी. गणित विषयात प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यास रोख रू. ३००१/- बक्षीस दिले जाईल.

२) संस्थेचे माजी व्हा. चेअरमन व विद्यमान संचालक **श्री. शक्ती श्रीकांत दबडे** यांचेकडून कै. छाया श्रीकांत दबडे यांचे स्मरणार्थ नीट परीक्षामध्ये खुला प्रवर्ग मधून सर्वाधिक गुण मिळवून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (MBBS) मध्ये प्रवेश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यास रोख रु. ५०००/- बक्षीस दिले जाईल.

३) संस्थेचे माजी चेअरमन **श्री. अभिमन्यु कामाण्णा मासाळ** यांचेकडून कै. कामाण्णा सिद्राप्पा मासाळ यांचे स्मरणार्थ वैद्यकिय शिक्षण पोस्ट ग्रॅज्युएट (M.D., M.D.S. M.S. etc) मध्ये प्रथम क्रमांक प्राप्त यांना रोख रू. ३००१/- बक्षीस दिले जाईल.

४) संस्थेचे माजी चेअरमन **श्री. दिलावर गुलाब उर्फ डी. जी. मुलाणी** यांचेकडून कै. गुलाब बापुसो मुलाणी यांचे स्मरणार्थ व्हॉलीबॉलमध्ये विशेष प्राविण्य मिळवलेल्या खेळाडूस रोख रू. ३००१/- बक्षीस दिले जाईल.

५) संस्थेचे माजी चेअरमन **श्री. प्रदिप बापूराव कदम** यांचेकडून कै. बापूराव मारूती कदम (गुरूजी) यांचे स्मरणार्थ अभियांत्रिकी पदवीका परिक्षेत सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यास बक्षीस रू. २००१/- दिले जाईल.

६) संस्थेचे माजी चेअरमन व विद्यमान संचालक **श्री. झाकीरहुसेन इब्राहीम चौगुले** यांचेकडून एम.ई./बी.ई. (सिव्हील/इलेक्ट्रॉनिक्स/मेकॅनिकल) मध्ये ज्या सभासदांच्या मुला-मुलींनी सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यास रोख रू. २००१ बक्षीस दिले जाईल.

७) संस्थेचे माजी चेअरमन **श्री. जाकीरहुसेन निजाम मुलाणी** यांचेकडून पै. निजाम रहिम मुलाणी यांचे स्मरणार्थ एम.ई./बी.ई. (इलेक्ट्रिकल) या पदव्युत्तर/पदवीमध्ये सर्वाधिक गुण मिळविलेल्या सभासदांच्या मुलां-मुलींना रोख रू. २००१/- बक्षीस दिले जाईल.

८) संस्थेच्या सभासद **सौ. पुष्पा कल्याणसिंग रजपूत** यांचेकडून कै. चतुरसिंग रामसिंग रजपूत यांचे स्मरणार्थ इ. १० वी, १२ वी तसेच कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील पदवीमध्ये सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या सभाससदांच्या मुला/मुलींना रोख रू. २००१/- बक्षीस दिले जाईल.

९) संस्थेचे माजी चेअरमन **श्री. सुरेंद्र उर्फ बाळासाहेब गजानन पेंडूरकर** यांचेकडून कै. गजानन बंडोपंत पेंडूरकर उर्फ रघुनाथ स्वामी यांचे स्मरणार्थ एस.एस.सी (दहावी) परीक्षेत संस्कृत या विषयात सर्वाधीक गुण मिळविणाऱ्या सभासदांच्या मुलां/मुलींना रोख रू. २००१/- बक्षीस दिले जाईल.

१०) संस्थेचे माजी चेअरमन **श्री.नंदू ज्ञानू ढोबळे** यांचेकडून संस्थेच्या कर्मचाऱ्यांच्या मुला/मुलींना इयत्ता १०, १२ वी व पदवीमध्ये गणित व इंग्रजी विषयामध्ये सर्वाधिक गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यास बक्षीस रोख रू.१५३०/- विभागून देण्यात येईल.

११) संस्थेचे माजी चेअरमन **श्री. पी. एन. काळे** यांचेकडून आई कै. पार्वती नारायण काळे यांचे स्मृतीप्रित्यर्थ राज्य स्तरीय ॲथलेटीक मध्ये यश मिळविलेल्या एका विद्यार्थ्यास रोख रु. १००१/- बक्षीस दिले जाईल.

१२) संस्थेचे माजी चेअरमन **श्री. सुभाष शिवाजी पाटील** यांचेकडून कै. शिवाजीराव रावसो पाटील (मणेराजूरी) यांचे स्मरणार्थ इ. १० मध्ये गणित व इंग्रजी विषयामध्ये सर्वाधीक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यास रोख बक्षीस रूपये १००१/- विभागून दिले जाईल.

१३) संस्थेचे हितचिंतक व सभासद **श्री. सुनिल दत्तात्रय जाधव** यांचेकडून कै. डी. ए. जाधव यांचे स्मरणार्थ इ. १ ली ते ४ थीच्या वर्गात अ -१ श्रेणीनुसार येणाऱ्या विद्यार्थ्यातून सोडतीनुसार सभासदांच्या मुलांमध्ये जास्त गुण मिळविणाऱ्या पहिल्या दोन विद्यार्थ्यांना रोख प्रत्येकी १०००/- रूपये बक्षीस दिले जाईल.

१४) **श्री. राहूल हरिश्चंद्र कांबळे** यांचेकडून माजी चेअरमन कै. हरिश्चंद्र धोंडीराम कांबळे यांचे स्मरणार्थ सी.ई. टी. परीक्षेत मागासवर्गीयांमध्ये सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या सभासदांच्या मुला/मुलींना रोख रू. १००१/- बक्षीस दिले जाईल.

१५) संस्थेचे माजी चेअरमन **श्री. सतीश वसंतराव भोसले** यांचेकडून कै. शिरीष सतीश भोसले यांचे स्मरणार्थ कॉम्प्युटर्स पदवीमध्ये सर्वाधीक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यास किंवा बारावी (पी.सी.एम. ग्रुप) मध्ये सर्वाधीक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यास रोख रू. १००१/- स्वरूपात बक्षीस दिले जाईल.

**टीप :** सर्व सभासदांना विनंती करणेत येते की, उत्तेजनार्थ बक्षीस योजनेचा लाभ घेणेकरिता सोबत दिलेल्या नमुन्यात आपल्या पाल्याचा अर्ज गुणपत्रिकेच्या छायांकित व साक्षांकित प्रतीसह **दि. १०/०९/२०२५** चे आत संस्थेच्या कार्यालयात अगर शाखेत पाठविणेत यावेत.

**परिपत्रक/नमुना अर्ज आपल्या सूचना फलकावर लावून कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून सहकार्य करावे ही विनंती.**

**सौ. सुषमा संतोष जाधव**
व्हा.चेअरमन

**श्री. राजेंद्र सखाराम कांबळे**
चेअरमन

**सर्व संचालक मंडळ व कर्मचारी वृंद**

टीप :

१) आणखी कोणी उत्तेजनार्थ बक्षीस ठेवणार असल्यास त्यांनी संस्थेच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

२) बक्षीसास अपात्र झालेल्या विद्यार्थ्यांना लेखी कळविले जाणार नाही.

३) सभासदांनी बक्षीस योजनेकरीता एकच अर्ज करावा व त्यामध्ये वैयक्तिक बक्षिसाचा अ. क्र. नमूद करावा.